# वीर अभिमन्यु

श्रीनिवास उडुपा



BvBK-0401313

BVBK-0401313

वाच. बा. का.
9393
धा।८२

पुष्प ६

# वीर अभिमन्यू

लेखक
श्रीनिवास उडुपा

अनुवादक
शशिकुमार भगत

BVBK-0401313

मुख्य संपादक
एल. एस. शेषगिरिराव

भारत-भारती (मराठी संस्करण)
रुईकर पथ, नागपूर-२

प्रकाशक

भारत-भारती (मराठी संस्करण) बाल पुस्तकमाला

प्रभाकर फैजपूरकर

मंत्री

श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती

रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

संपादक–मराठी संस्करण

सुरेश दत्तात्रेय देशपांडे

पहिली आवृत्ती–जुलै १९८०

दुसरी आवृत्ती–एप्रिल १९८१

मूल्य रु. २–००

मुद्रक

चंद्रकांत तापस

श्री प्रसाद मुद्रण, ८ वर्धा मार्ग, नागपूर–१२

क्र. 9393 ६।१।८२
विषय क्र. ......

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना, आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोट्या–छोट्या पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती'ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपणासही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत

**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

संपादक

# वीर अभिमन्यू

महाभारतीय युद्धात आपले असामान्य साहस, शौर्य, शस्त्र-विद्या आणि चपळता यामुळे ज्या बालवीराने कौरवसेनेतील महान रथी-महारथी आणि योद्धे यांच्या नाकी नऊ आणले त्या पार्थपुत्र अभिमन्यूची ही कथा.

केवळ सोळा वर्षांचा हा किशोर, परंतु मोठमोठे कौरव-वीर त्याच्यासमोर टिकू शकले नाहीत. अखेर धर्मयुद्धाचे नियम मोडूनच कौरवांनी त्याचा वध केला.

• • •

क्र. १३१३ ६।११.८२
विभाग

# वीर अभिमन्यू

अभिमन्यूची व्यक्तिरेखा ही महाभारतातील एक असामान्य व्यक्तिरेखा आहे. कुरुक्षेत्रावर कौरव पक्षाकडील रथी-महारथींशी प्राणपणाने झुंज देऊन या सोळा वर्षीय बालकाने वीरमरण पत्करले. अल्पवयात त्याने दाखविलेल्या अतुलनीय पराक्रमा-मुळे युद्धभूमीवरील योद्धे चकित झाले. रणांगणावर त्या बालवीराने दाखविलेल्या शौर्याची तुलना होऊ शकत नाही. करायचीच झाली तर मध्यान्हीच्या तळपत्या सूर्याशीच करावी लागेल. या सूर्याची दाहकता सहन करणे कौरव वीरांना कठिण गेले. सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रांचे त्याला सखोल ज्ञान होते. वीर अभिमन्यू आपल्या अपूर्व शौर्यामुळे अमर झाला.

एका कन्नड कवीने लिहिले आहे, " सिंहाचा छावा मदमस्त हत्तींच्या कळपावर तुटून पडला

आहे किंवा गरुडावर हजारो सापांनी आक्रमण केले आहे, असे युद्धभूमीवरील ते दृश्य होते."

महर्षी व्यासांनी अभिमन्यूची कथा महाभारतात कथन केली आहे. अभिमन्यू हा अर्जुनाचा पुत्र. श्रीकृष्णाच्या वहिणीशी, सुभद्रेशी अर्जुनाचा विवाह झाल्यावर तिच्या पोटी अभिमन्यूचा जन्म झाला. म्हणजे अभिमन्यू भगवान श्रीकृष्णाचा भाचा होता.

इंद्रप्रस्थ नगरीत पंडुपुत्र पांडव राज्य करीत होते. सत्याचे पुरस्कर्ते, सदाचारी, न्यायप्रिय व पराक्रमी म्हणून पांडवांची ख्याती होती. युधिष्ठिर सर्वात मोठे त्यामुळे राज्यकारभाराची धुरा त्यांच्यावरच होती. भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे त्यांचे भाऊ त्यांना त्यासाठी साह्य करीत होते.

अभिमन्यूच्या जन्मापूर्वीची गोष्ट. सुभद्रा आई होणार होती. तिला माहेरी न्यायला भगवान श्रीकृष्ण इंद्रप्रस्थ नगरीत आले होते. सुभद्रेने घरच्या

वडीलधाऱ्या माणसांचा आशीर्वाद घेतला आणि भावाबरोबर ती माहेरी निघाली.

श्रीकृष्ण द्वारकेला राहत असत. इंद्रप्रस्थ ते द्वारका हे अंतर बरेच होते. श्रीकृष्ण व सुभद्रा यांचा रथातून प्रवास सुरू झाला. रथाचे सारथ्य स्वतः श्रीकृष्ण करीत होते. कारण सुभद्रा गर्भवती होती व तिला कोणताही त्रास होऊ न देता हा प्रदीर्घ प्रवास त्यांना पूर्ण करायचा होता. प्रवास सुरूच होता. पण वेळ जात नव्हता.

श्रीकृष्ण म्हणाले, "सुभद्रे कंटाळलीस ? एखादी कथा सांगू ?" यावर सुभद्रा हंसली नि म्हणाली, "दादा अजून मला लहान समजतोस ? कथा सांगण्यापेक्षा मला रणांगणावरच्या गोष्टी ऐकणे आवडेल. माझ्या पतीचे शौर्य, युद्धकौशल्य, लढाईच्या मैदानावरची व्यूहरचना मला समजावून सांग."

"...तर आमच्या बहिणीची आता युद्धक्षेत्रात उतरायची तयारी दिसते." स्मित करीत श्रीकृष्ण उद्‌गारले.

सुभद्रेने पटकन उत्तर दिले, "काय हरकत आहे ? मी रणक्षेत्रात त्यांच्या खांद्याला खांदा लावून उभी राहू शकणार नाही काय ?"

"माझ्या म्हणण्याचा अर्थ तसा नाही. वास्तविक अर्जुन एवढा शूर आहे की, तुला रणांगणांत उतरायची कधी आवश्यकताच पडणार नाही." श्रीकृष्ण तिला समजावीत म्हणाले.

"त्यांच्या वीरतेबद्दल तर मीही खूप ऐकले आहे. त्यांनी आजपर्यंतचे सारे जीवन युद्धकलेचे ज्ञान संपादन करण्यातच घालविले." सुभद्रा उत्तरली.

'सुभद्रा गर्भवती आहे, तिची प्रत्येक इच्छा पूर्ण व्हायला हवी. युद्धकला जाणून घ्यायला ती उत्सुक आहे. तिच्या गर्भात असलेल्या मुलाला पुढे सारे शिकायचेच आहे,' असा विचार करून श्रीकृष्णांनी तिला रणनीती सांगायला सुरुवात केली.

द्रोणाचार्यांनी अर्जुनाला कोणती शस्त्रे शिकविली, सैन्याची व्यूहरचना कशी असते, या व्यूहात कसा प्रवेश करायचा, अशा अनेक गोष्टी श्रीकृष्ण सुभद्रेला सांगत होते आणि त्यांचा द्वारकेचा प्रवास सुरू होता. सुभद्रेच्या गर्भात वाढत असलेला वीर बालकही श्रीकृष्णाच्या या कथा ऐकून हुंकार देत होता.

पतीच्या शौर्य-गाथा ऐकून सुभद्रेला आनंद झाला. ती म्हणाली, "माझा मुलगाही आपल्या पित्यासारखा महान पराक्रमी होईल ना?"

श्रीकृष्ण प्रसन्न हसले. ते स्वतः अद्वितीय योद्धे होते. बालपणीच त्यांनी अत्याचारी कंसाचा वध केला होता. वहिणीची इच्छा ऐकून त्यांनी तिला आशीर्वाद दिला. "तुझ्या पुत्राच्या अतुल शौर्याने सारे जग थक्क होईल."

श्रीकृष्ण सुभद्रेसह द्वारकेत पोहोचले तेव्हा सारीकडे आनंदाचे वातावरण पसरले. सुभद्रेला आरतीने ओवाळण्यात आले. तिने राजमहालात

प्रवेश केला. नव्या बाळाच्या आगमनाची प्रतिक्षा सुरू झाली, दिवस जाऊ लागले.

यथावकाश सुभद्रा प्रसूत होऊन तिला पुत्ररत्न प्राप्त झाले. त्याचे नाव अभिमन्यू ठेवण्यात आले. सुभद्रेला पुत्ररत्न प्राप्त होताच द्वारकेत मंगलवाद्ये वाजू लागली. आनंदोत्सव साजरा होऊ लागला. हत्तीवरून साखर वाटली गेली. इंद्रप्रस्थ नगरीत ही वार्ता कळविण्यात आली. तेथेही आनंदाला उधाण आले.

काही दिवसानंतर स्वतः श्रीकृष्ण सुभद्रा व अभिमन्यू यांना इंद्रप्रस्थाला पोहोचवून आले. तेथे अभिमन्यू मोठा होऊ लागला. त्याचे शिक्षण सुरू झाले. त्याच्या बुद्धीची चुणूक लहानपणापासूनच दिसायला लागली. त्याचा पिता विख्यात धनुर्धारी होता. भगवान श्रीकृष्ण त्याचे मामा होते. मातुल आणि पितृ-घराण्याचे सारे गुण अभिमन्यूत उतरले नसते तरच नवल !

दिवस जात होते. पण नियतीला पांडवांचे हे

सुख फार दिवस पाहवले नाही आणि एक दिवस पांडव एका भीषण संकटात सापडले.

धृतराष्ट्र पांडवांचे काका होते. ते जन्मतःच आंधळे होते. त्यांना शंभर मुले होती व ती कौरव या नावाने ओळखली जात. दुर्योधन हा ज्येष्ठ कौरव. कौरव आपल्या चुलत भावांचा म्हणजे पांडवांचा द्वेष करीत होते. पांडवांना राज्याधिकार मिळू नये अशी त्यांची इच्छा होती. शूरवीर असूनही पांडवांनी स्वतःकडे नेहमी कमीपणा घेतला. पण कौरवांचा द्वेष व ईर्ष्या कधीच कमी झाली नाही. ते पांडवांना नेहमी पाण्यात पाहत. पांडवांना निष्कांचन करावे, त्यांचे राज्य हिसकावून घ्यावे असे कौरवांना नेहमी वाटायचे.

आणि एक दिवस कौरवांनी कपट-व्यूह रचला. त्यांनी पांडवांना द्यूत खेळायचे निमंत्रण दिले. सत्यवचनी-सरळमार्गी युधिष्ठिर हे निमंत्रण नाकारणार नाही याची त्यांना खात्री होती. द्यूताचे निमंत्रण युधिष्ठिराने स्वीकारले. कौरवांची व्यूह-

रचना यशस्वी झाली. कपटाने खेळून त्यांनी पांडवांना हरविले. त्यांचे राज्य हिरावून घेतले. ठरल्याप्रमाणे पांडवांना बारा वर्षे वनवासात जावे लागले. त्यानंतर एक वर्ष त्यांना अज्ञातवासात राहायचे होते. या अज्ञातवासात पांडव ओळखले गेले तर पुन्हा त्यांना बारा वर्षे वनवासात जावे लागणार होते. वास्तविक द्यूतात फक्त युधिष्ठिर हरले होते. पण त्याच्या चारही भावांनी वडील भावाची आज्ञा प्रमाण मानली आणि राज्याचा त्याग करून पाचही पांडव, द्रौपदी, सुभद्रा-अभिमन्यू यांच्यासह बारा वर्षासाठी वनवासात प्रस्थान करण्याची तयारी केली.

श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच ते तातडीने पांडवांना भेटायला आले. पांडवांचे राज्य गेले होते. ते निष्कांचन झाले होते. कौरवांच्या दरबारात अपमानित झालेले पांडव संतापाने जळत होते. पण युधिष्ठिराचा शब्द फसला होता. ज्येष्ठ भावाच्या शब्दाची किंमत इतर भावांना ठेवायलाच हवी होती.

श्रीकृष्णाने त्यांना धीर दिला, समजावले. पांच पांडव द्रौपदीसह वनवासाला निघाले आणि श्रीकृष्ण सुभद्रा व अभिमन्यू यांना घेऊन द्वारकेला परत आले.

आता द्वारकेत श्रीकृष्ण व बलराम यांच्या देखरेखीखाली अभिमन्यूचे शिक्षण सुरू झाले. बलराम स्वत: गदायुद्धात अत्यंत निष्णात होते. भीमाला गदा त्यांनीच शिकविली होती. श्रीकृष्णांनी अभिमन्यूला रणांगणावर व्यूहरचना कशी करावी शत्रूच्या व्यूहात कसा प्रवेश करावा आदि निरनिराळ्या युद्धनीतीमध्ये पारंगत केले. युद्धभूमीवर चक्रव्यूह फोडून आत प्रवेश करू शकणारा अभिमन्यू हा अर्जुनाव्यतिरिक्त एकमेव वीर होता.

असे म्हणतात की, श्रीकृष्णाने गर्भवती सुभद्रेला द्वारकेला आणताना चक्रव्यूहात प्रवेश कसा करावा हे सांगितले होते. तेव्हा तिच्या गर्भात असलेल्या अभिमन्यूने ते शिकून घेतले होते. नंतर लगेच त्यांचा रथ द्वारकेला पोच-

त्यामुळे चक्रव्यूहातून बाहेर कसे पडावे, ही बाब अर्ध्यावरच राहिली होती.

काळ पुढे सरकत होता. पांडव अजून वनवासातून परतले नव्हते. पांडवाचा वनवास व अज्ञातवास संपण्याची सुभद्रा वाट पाहत होती. हा प्रदीर्घ काळ तिला माहेरी द्वारकेत काढावा लागला. अर्जुनाशिवाय राहणे कठीण होते. पण अभिमन्यूकडे पाहून आपला पुत्र एक शूर योद्धा बनतोय, या समाधानात ती दिवस काढीत होती.

बलरामाला वत्सला नावाची एक गोड मुलगी होती. वत्सला लहान होती तेव्हाच सुभद्रेने तिला आपली सून करून घ्यायचे ठरविले होते. आपल्या मोठ्या भावाजवळ, बलरामाजवळ तिने तशी मागणी घातली होती व त्याचा होकारही घेऊन ठेवला होता. पण जेव्हा बलरामाने सुभद्रेची ही मागणी मान्य केली तेव्हा पांडव इंद्रप्रस्थ नगरीचे अधिपती होते.

आता मात्र परिस्थिती पालटल्यामुळे बल-रामाचा विचारही बदलला. पांडव वनवासात गेले होते. ते राजे नव्हते. ज्यांच्याजवळ राहायला घरही नाही, अशा घरी आपली मुलगी द्यायची ? पांडवांचा वनवास अजून संपायचा होता. पुढे एक वर्ष अज्ञातवास ! या काळात ते ओळखले गेले तर पुन्हा वनवास अटळ ! आणि परतले तरी नियतीने कोणते ताट वाढून ठेवले आहे, कुणी सांगावे ? अशा ठिकाणी वत्सलेची गाठ बांधून द्यायची ? स्वत:हून तिला या दु:खाच्या खाईत लोटायचे ? बलराम जो जो विचार करू लागले, तो तो त्यांचा निर्णय पक्का होऊ लागला. अभिमन्यूला मुलगी द्यायची नाही. मग आपल्या तोलामोलाचा दुसऱ्या वर शोधायला हवा. त्यांच्या डोळ्यांसमोर लक्ष्मणकुमार उभा राहिला. दुर्योधनाचा पुत्र लक्ष्मणकुमार ! दुर्योधन सम्राट होता. बलरामाचा शिष्य होता. वीर होता. दुर्योधनाबद्दल बलरामाला जिव्हाळा होता आणि त्यांच्या मनात विचार दृढ झाला, लक्ष्मणकुमाराला आपला जावई करायचे.

हे वृत्त कळताच सुभद्रेला जबर धक्का बसला. आपला पती संकटात आहे म्हणून भावाकडून हा अपमान झाला, हे जाणून तिचे मन आक्रंदू लागले. शेवटी भगवान श्रीकृष्णाजवळ तिने आपले मन मोकळे केले. श्रीकृष्णाने सुभद्रेला धीर दिला व ते बलरामला भेटायला गेले. बलरामाला त्यांनी समजावले. पांडव आज ना उद्या सम्राट होणारच, याची त्यांनी ग्वाही दिली. पण बलरामाचा निर्णय बदलला नाही.

अभिमन्यूला ही गोष्ट कळली तेव्हा तो संतप्त झाला. ज्या मातुलगृही आपला जाणून बुजून अपमान होतोय तेथे राह्यचे नाही असे त्याने ठरविले. आपल्या मातेसह तो द्वारकेतून पांडवांकडे वनात जायला निघाला.

पांडवांना भेटायला जात असताना वाटेत त्यांना हिडिम्बवन नावाचे घनदाट जंगल लागले. घटोत्कच या जंगलाचा राजा होता. त्याच्या आईचे नाव हिडिम्बा. या वनात भीम आला असताना

त्याने हिडिम्बेशी लग्न केले होते. त्यानंतर घटोत्कचाचा जन्म झाला. घटोत्कच भीमपुत्र आहे, याची सुभद्रेला वा अभिमन्यूला कल्पना नव्हती. घटोत्कचाच्या राज्यात अभिमन्यूचा प्रवेश होताच हा भीमकाय राक्षसराजा नाराज झाला आणि तो अभिमन्यूवर चालून गेला.

घटोत्कच भीमपुत्र होता तर अभिमन्यू महाबली अर्जुनाचा सुपुत्र. अभिमन्यूने धनुष्याला प्रत्यंचा लावली तेव्हा घटोत्कचाला वाटले, हा बालक माझ्यासारख्या राक्षसाशी काय लढत देणार ? पण त्याचा भ्रमनिरास झाला. दोन सिंहांचीं ही झुंज पाहून सारे जंगल शहारले, स्तब्ध झाले. साऱ्यांचे श्वास रोखले गेले. घटोत्कचाने अंगात रुतलेले तीर काढून टाकले. नव्या जोमाने त्याने अभिमन्यूवर हल्ला केला. पण अभिमन्यूच्या प्रखर माऱ्यापुढे त्याला पराभूत व्हावे लागले नि तो बेशुद्ध होऊन खाली कोसळला.

घटोत्कचाचा आवाज ऐकून हिडिम्बा तेथे धावतच आली. आपल्या मुलाची झालेली दुर्दशा



घटोत्कच अभिमन्यूच्या बाणांनी घायाळ झाला.

पाहून ती शोक करू लागली. घटोत्कचाचे डोके आपल्या मांडीवर घेऊन भीमाची आठवण काढीत ती रडू लागली.

भीमाचे नाव ऐकून सुभद्रा व अभिमन्यू दोघेही आश्चर्यचकित झाले. भीमाचा व यांचा काय संबंध हे त्यांच्या लक्षात येईना. शेवटी सुभद्रेने हिडिम्बेला विचारले, " तुम्ही कोण ? याची आम्हाला कल्पना नाही. हा भीमपुत्र कसा ? "

हिडिम्बेने डोळ्यांतील अश्रू पुसून आपली कथा सांगितली. वऱ्याच वर्षापूर्वी भीम या जंगलात आले तेव्हा भीमाचे हिडिम्बेच्या भावाशी घनघोर युद्ध झाले होते. त्यात हिडिम्बेचा भाऊ मारला गेला. त्यानंतर हिडिम्बेशी भीमाने विवाह केला होता.

सुभद्रा–अभिमन्यू यांना हे नाते समजले तेव्हा त्यांना आनंद झाला. त्याचबरोबर लढाईत आपण आपल्याच भावाला जबर जखमी केले, हे पाहून अभिमन्यूला वाईटही वाटले. त्याने बाजूच्या

सरोवरातून पाणी आणले व घटोत्कचाला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न केला.

थोड्याच वेळात घटोत्कच शुद्धीवर आला. त्याला व त्याच्या आईला सुभद्रा-अभिमन्यूचे नाते समजले तेव्हा अतिशय आनंद झाला आणि त्याने आपल्या भावाला मिठीत घेतले.

बलरामाने वत्सलेचा विवाह अभिमन्यूशी करून द्यायला नकार दिला; दुर्योधनपुत्राशी तिचा विवाह करायची तयारी सुरू झाल्यामुळे अपमानित होऊन अभिमन्यूला आपल्या आजोळहून बाहेर पडावे लागले, हे ऐकून घटोत्कचाला संताप आला. दुर्योधनाने धोका देऊन पांडवांना वनवासात पाठविले; आता तर बलरामाची मुलगीही स्नुषा म्हणून दुर्योधन नेणार आहे, हे पाहून घटोत्कचाचा राग अनावर झाला.

घटोत्कच सुभद्रा व अभिमन्यू यांच्यासह द्वारकेला परतला, वत्सलेला त्याने बलरामाच्या राजवाड्यातून उचलून आणले व अभिमन्यूच्या

स्वाधीन केले. वत्सला मनोमन अभिमन्यूवर प्रेम करीत होती. वत्सला अभिमन्यूशीच विवाहबद्ध होईल, असा घटोत्कचाने निर्धार केला. त्यासाठी आवश्यकता पडल्यास युद्धाला उभे राहण्याची घटोत्कचाची तयारी होती. श्रीकृष्णाच्या राज-वाड्यातले सारे चित्र आता बदलले होते. स्वत: भगवान श्रीकृष्ण अभिमन्यूच्या मागे उभे होते. बलराम प्रारंभी नाराज झाले. शेवटी आपल्या मुलीचा हात अभिमन्यूच्या हातात द्यायला त्यांना परवानगी द्यावी लागली. दुर्योधन व लक्ष्मण नाइलाजाने परतले आणि वत्सला-अभिमन्यू-विवाह अत्यंत थाटाने, अपूर्व उत्साहाने द्वारकेत पार पडला.

पांडवांचा वनवास संपत आला होता. एक वर्ष त्यांना अज्ञातवासात घालवायचे होते. त्यांनी वेष बदलून विराट राजाच्या दरबारात आश्रय घेतला. पाच पांडव व द्रौपदी विराटाच्या दर-बारात नोकरी करू लागले. धनुर्धारी अर्जुन बृहन्नडा या नावाने विराटाच्या नृत्यशाळेत विराट-कन्या उत्तरा हिला नृत्य शिकवू लागले. अज्ञातवासाचे



त्या शूर बालकाने आपल्या रथाचे चाक उपट

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रंथालय ठाणे.
१३९३ दि. ५।१।६२
विषय



…न हाती घेतले व तो शत्रूंवर तुटून पडला.

बारा महिने निघून गेले. पांडव प्रकट व्हायची वेळ आली. कौरवांना कुणकुण लागली की पांडव विराटाच्या दरबारात आहेत. अज्ञातवास पूर्ण होण्यापूर्वी पांडवांना ओळखता आले तर त्यांना पुन्हा बारा वर्षे वनवासात पाठविता येणार होते. पण ओळखायचे कसे ? कौरवांनी युक्ती केली विराटाचे गोधन पळवून नेले. सुटकेसाठी अर्जुनाला जावे लागले. त्याचे धनुर्विद्येतील कौशल्य पाहून अर्जुन ओळखला गेला. पण सुदैवाने त्यावेळी अज्ञात-वासाचा काळ संपला होता.

पांडव प्रकट झाले तेव्हा विराट राजाला अत्यंत आनंद झाला. आपल्या दरबारात या महा-पराक्रमी भावांना आश्रय घ्यावा लागला हे पाहून वाईटही वाटले. आपल्या मुलीशी उत्तरेशी अर्जु-नाने विवाह करावा अशी विराट राजाने इच्छा व्यक्त केली.

अर्जुनाने मात्र या इच्छेला मान दिला नाही. तो म्हणाला, "उत्तरेला मी नृत्य शिकवले. ती

माझी शिष्या आहे. तिचा विवाह माझ्या मुलाशी, अभिमन्यूशी झाला तर मला जास्त आनंद होईल," विराटाने ही गोष्ट मान्य केली.

विराटाचे दूत द्वारकेला गेले. श्रीकृष्ण व बलराम यांनाही निरोप पाठविण्यात आला आणि एका शुभ मुहूर्तावर उत्तरा-अभिमन्यू विवाहबद्ध झाले.

पांडवांचा वनवास व अज्ञातवास संपला होता. द्यूत खेळताना ठरलेल्या अटीनुसार पांडवांना त्यांचे राज्य परत मिळायला हवे होते. पण दुर्योधनाने नकार दिला. युद्ध व्हावे असे पांडवांना, विशेषतः युधिष्ठिराला वाटत नव्हते. युद्धाच्या परिणामाची त्याना जाणीव होती. शेवटी युधिष्ठिराने भगवान श्रीकृष्णाबरोबर निरोप पाठविला। "आम्हाला राज्य नको, केवळ पाच गावे दिली तरी आम्ही संतुष्ट राहू."

पण दुर्योधनाने ठामपणे नकार दिला. तो म्हणाला, "पाच गावेच काय, पण सुईच्या अग्रावर

मावेल एवढीही जमीन द्यायची माझी तयारी नाही. पांडवांनी युद्ध करावे व शक्ती असेल तर आपले राज्य परत घ्यावे."

दुर्योधनाच्या या निरोपाने पांडवांना धक्काच बसला. श्रीकृष्णाची शिष्टाई असफल झाली. युद्ध अपरिहार्य झाले. पांडवांनीही सैन्य जमवायला सुरुवात केली.

कुरुक्षेत्रावर दोन्ही सैन्ये समोरासमोर उभी ठाकली. पाडवांच्या वाजूने सात अक्षौहिणी तर कौरवांकडे अकरा अक्षौहिणी असे एकूण अठरा अक्षौहिणी सैन्य रणांगणावर उभे होते व हे युद्धही अठराच्च दिवस चालले. कौरवांच्या वाजूला पितामह भीष्म, कौरव-पांडवांचे गुरू द्रोणाचार्य, द्रोणपुत्र अश्वत्थामा, महारथी कर्ण अशासारखे वीर होते. दुर्योधन व त्याचा भाऊ दुःशासन हे दोघेही शूर योद्धे म्हणून ख्यात होते. जयद्रथ शल्य आदी रथी-महारथी कौरवांची धुरा सांभा-ळीत होते.

पांडवांच्या पराक्रमाबद्दल प्रश्नच नव्हता. भीमाची गदा पाहून शत्रू चळचळा कापत. अर्जुनाच्या गांडीव धनुष्याला तोंड द्यायची कुणाचीच प्राज्ञा नव्हती. भीमपुत्र घटोत्कचाच्या मायाजाळाला सारे घाबरत. पांडवसेनेचे संचालन द्रौपदीचा भाऊ धृष्टद्युम्न करीत होता. आणि सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे अर्जुनाच्या रथाचे सारथ्य स्वतः भगवान श्रीकृष्ण करीत होते.

युद्ध सुरू झाले. रक्ताच्या नद्या वाहू लागल्या. शस्त्रांच्या आवाजाने आणि जखमी सैनिकांच्या विव्हळण्याने सारा आसमंत भरून गेला. प्रेतांचा खच पडला. योद्ध्यांच्या रक्ताने कुरुक्षेत्राची धरा चिंब झाली.

अत्यंत भीषण असे हे युद्ध होते. भीष्म, द्रोण, कर्ण, भीम, अर्जुन यांच्यासारखे योद्धे या युद्धात तळपत होते. हजारो सैनिकांचा संहार झाला. अर्थात वीर अभिमन्यूही या युद्धापासून दूर नव्हता. त्याचे युद्धकौशल्य पाहून सारे योद्धे भयचकित झाले.

युद्ध सुरू होऊन नऊ दिवस झाले होते. अभिमन्यूच्या शरवर्षावाने कौरव सैन्य मेटाकुटीस आले होते. त्याचा बाण कधी वाया गेला नाही. आज हा सिंहाचा छावा जणू संतप्त झाला होता. हा तळपता सूर्य रणांगणात उतरला आणि कौरव सैन्याला त्याने 'दे माय धरणी ठाय' करून सोडले. त्याला थांबवायला कृपाचार्य पुढे आले. त्यांच्या मदतीला नंतर अश्वत्थामा व सैन्धव आले. पण त्यांना पराभव स्वीकारावा लागला. शेवटी त्यांच्या साह्यार्थ स्वतः गुरू द्रोणाचार्य आले. तेव्हा कुठे अभिमन्यूच्या शर-वर्षावाला ते तोंड देऊ शकले. त्याचे हे अतुलनीय शरसंधान पाहून द्रोणांना आश्चर्य वाटले. त्यांनी आतापर्यंत अर्जुनाचे युद्ध-कौशल्य पाहिले होते. आज त्यांना जाणवले, रणांगणावर एक नव्हे दोन अर्जुन आहेत.

दुर्योधनाने अलम्बुस नावाच्या राक्षसाला अभिमन्यूवर पाठविले. त्या राक्षसाच्या अकस्मात हल्ल्याने पांडव सैन्य गोंधळले. भयभीत झाले. माघारी परतू लागले. त्या राक्षसाला तोंड द्यायला द्रौपदीचे पुत्र पुढे आले. त्यांचे घोडे व सारथी

अलंबुसने ठार मारले. आता भावाच्या मदतीसाठी अभिमन्यू पुढे आला. त्याच्या अचूक शरसंधानाने राक्षसराज जखमी झाला, तेव्हा त्याने मायावी रूप घेतले. युद्धभूमीवर अंधार पसरविला. हे पाहताच अभिमन्यूने सूर्यास्त्राचा प्रयोग केला. शेवटी त्या राक्षसाला या बालवीरापुढे पराभव स्वीकारावा लागला.

अभिमन्यूला आता आणखी स्फुरण चढले. या वादळाला तोंड देणे कौरवसेनेला कठीण गेले. तेव्हा स्वतः पितामह भीष्मांना कौरवांच्या रक्षणार्थ पुढे यावे लागले. त्यांच्या बाणांच्या वर्षावाचा अभिमन्यू तेवढ्याच कौशल्याने प्रतिकार करीत होता. भीष्म व अभिमन्यू यांच्यातील युद्धाची वार्ता कळताच अर्जुन पुत्राच्या मदतीला धावला. युद्ध सुरूच होते. सायंकाळ झाली. दोन्ही सैन्ये शिबिरात परतली. पण त्या दिवशी साऱ्यांच्या तोंडी चर्चेचा एकच विषय होता—अभिमन्यू !

महाभारतीय युद्धाच्या अकराव्या दिवशीही अभिमन्यूच्या पराक्रमाने कौरवसेना त्रस्त झाली.

कौरवांकडे पौरव नावाचा सेनानी होता. त्यादिवशी अभिमन्यूची पहिली गाठ पौरवाशी पडली. अभिमन्यू धनुष्याला प्रत्यंचा लावत असता पौरवाने बाण सोडून त्याचे धनुष्य मोडून टाकले. तेव्हा अभिमन्यू तलवार घेऊन पौरवावर चालून गेला. क्षणार्धातच त्याने पौरवाला खाली लोळविले. ते पाहून सिंधू देशाचा राजा जयद्रथ त्याच्या मदतीला धावला. जयद्रथ अभिमन्यूचा द्वेष करीत होता. अभिमन्यू व जयद्रथ यांच्यात भीषण युद्ध झाले. कुणी कुणाला हार जाईना. जयद्रथाने निर्वाणीचा वार केला, तो वार अभिमन्यूने तेवढ्याच समर्थपणे झेलला. त्याचे शस्त्र अभिमन्यूच्या ढालीत घुसून तुटले. आता जयद्रथ घाबरला. आणि क्षणार्धात पळून गेला. ते पाहून शल्याने अभिमन्यूवर अग्निबाण सोडला. तोही अभिमन्यूने कौशल्याने परतविला. त्या बाणाने शल्याचा सारथीच ठार झाला. त्यानंतर शल्याने गदा हाती घेतली. गदायुद्धातही अभिमन्यू हार मानणारा नव्हता. एवढ्यात भीम तेथे पोहोचला. अभिमन्यूला त्याने मागे केले.

महाभारतीय युद्धाचा आज बारावा दिवस होता. पितामह भीष्म शरशय्येवर होते. द्रोणाचार्यांच्या हाती कौरवसेनेची धुरा होती. सतत पराभव स्वीकारावा लागल्याने दुर्योधन दुःखी होता. गुरू द्रोणांजवळ त्याने आपले मन मोकळे केले. द्रोणाचार्यही चिंतेत होते. ते म्हणाले, "अर्जुनाच्या शौर्यामुळे आम्हाला पराभव स्वीकारावा लागतो आहे. अर्जुनाला अन्यत्र युद्धात गुंतवून ठेवले तर इतर पांडवांचा मी पराभव करू शकेन."

त्यानंतर कौरवसेनेतील पाच योद्ध्यांनी अर्जुनाचा पराभव करण्याची शपथ घेतली. जिंकू किंवा मरू या ईर्षेने त्यांनी अर्जुनाला युद्धात आव्हान द्यायचे ठरविले.

युद्धाचा तेरावा दिवस उजाडला. अर्जुन रणांगणावर येताच या पाच योद्ध्यांचे आव्हान त्याला स्वीकारावे लागले. श्रीकृष्ण त्याचे सारथ्य करीत होते. शत्रूशी लढाई करीत युद्धभूमीपासून अर्जुन दूर गेला होता.

इकडे द्रोणाचार्यांनी आपल्या सैन्याची चक्रव्यूहरचना केली. चक्रव्यूह भेदून आत प्रवेश करणे कठिण होते. भगवान श्रीकृष्ण व अर्जुन यांना चक्रव्यूह तोडता येत होता. त्यापैकी श्रीकृष्णाने तर हाती शस्त्र धरणार नाही अशी प्रतिज्ञा केली होती. अर्जुन युद्धभूमीपासून दूर, अन्य वीरांना तोंड देत होता. जो चक्रव्यूह भेदू शकत होता. असा एकच योद्धा आता पांडवांकडे शिल्लक होता; तो म्हणजे वीर अभिमन्यू.

चक्रव्यूहात प्रवेश करणे अभिमन्यूला माहिती होते पण त्यातून बाहेर निघणे मात्र त्याला ठाऊक नव्हते. पांडव हतवल झाले. युधिष्ठिर काळजीत पडले. पांडवांच्या प्रतिष्ठेचा प्रश्न होता. अभिमन्यूला हे समजताच तो आपल्या काकांना भेटायला आला व म्हणाला, "चक्रव्यूह भेदून मी आत प्रवेश करीन. आपण काळजी करू नये."

अभिमन्यूचे हे धाडस पाहून पांडव वीर आश्चर्यचकित झाले. या संकटात त्याला लोटायची युधिष्ठिरांची तयारी नव्हती. ते म्हणाले, "अभिमन्यो,

तू अजून लहान आहेस. चक्रव्यूहात शिरून कौरव-सेनेतील अनुभवी रथींना तोंड देणे ही सामान्य गोष्ट नाही."

युधिष्ठिर त्याला समजावत होते, पण अभिमन्यू आपल्या निर्णयावर कायम होता. त्याला चक्रव्यूह भेदायला परवानगी हवी होती. शेवटी युधिष्ठिरांनी अभिमन्यूच्या हट्टापुढे मान तुकवली. ते म्हणाले, "अभिमन्यो, तू चक्रव्युहाचा भेद कर. मी, भीम, सात्यकी, धृष्टद्युम्न व पांचाल तुझ्या पाठोपाठ व्यूहात प्रवेश करू."

अभिमन्यूला आनंद झाला. तो म्हणाला, "तुम्ही काळजी करू नका. पांडवांना पराभव स्वीकारावा लागणार नाही." युधिष्ठिराचा, अन्य पांडवांचा व आईचा त्याने आशीर्वाद घेतला. उत्तरेने त्याच्या कपाळावर कुंकुमतिलक लावून त्याच्या यशासाठी शुभेच्छा व्यक्त केली. तिच्या मनातील अस्वस्थता तिने चेहऱ्यावर दिसू दिली नाही. कारण ती वीर-पत्नी होती. शस्त्रास्त्रे घेऊन अभिमन्यू रथावर चढला.

शाखा.
क्र. १३९३ दि. ६।१।८२



युधिष्ठिराची अनुमती घेताना वीर अभिमन्यू.

युद्धभूमीकडे अभिमन्यूचा रथ जात असता त्याचा सारथी त्याला सांगत होता. "एक खूप मोठी जबाबदारी तू स्वीकारली आहेस. युद्धाचे तुला पुरेसे ज्ञान नाही. अशा स्थितीत द्रोणाचार्या-सारख्या निष्णात योद्धयांशी टक्कर देणे सोपे नाही."

त्यावर हसून अभिमन्यू आत्मविश्वासाने उत्तरला, "अरे, अग्नी कधी वर्फाला घाबरला आहे? सिंहाला जंगलात कधी भीती वाटते? युद्धात प्रत्यक्ष ब्रह्मदेव उतरला तरी त्याच्यासमोरही मी कधी पराभूत होणार नाही."

अभिमन्यूचा रथ युद्ध-भूमीवर उभा ठाकला. कौरवसेनेतील रथी महारथी समोर होते. युद्धाला तोंड लागले या वीरांच्या माऱ्याला तोंड देत सहजतेने अभिमन्यू पुढे सरकत होता. त्याचे असामान्य शौर्य पाहून सारेच आश्चर्यचकित झाले. चारही बाजूने कौरववीर त्याच्यावर तुटून पडले होते. पांडवांच्या पराभवासाठी द्वेषाने, ईर्ष्येने पेट-लेले, चिडलेल्या सापासारखे! पण अभिमन्यूच्या

शरवर्षावापुढे ते हतबल झाले. त्याचा कोणताही बाण वाया गेला नाही. कौरवसेना भयभीत झाली.

प्रचंड वृक्षांची राखरांगोळी करीत पुढे सरकत जाणाऱ्या वणव्याप्रमाणे कौरवसेनेचा संहार करीत अभिमन्यू द्रोणाचार्यापुढे उभा राहिला तेव्हा क्षणभर त्यांच्याही डोळ्यात कौतुकाचे भाव उमटले.

दुर्योधनाला हे वृत्त समजताच तो तातडीने अभिमन्यूला तोंड द्यायला द्रोणाचार्याजवळ आला. नेमका त्याच वेळी दुर्योधनाचा रथ द्रोणाचार्याकडे जात असलेला पाहून कर्ण व कृपाचार्य यांनीही आपले रथ त्यामागोमाग भरधाव सोडले आणि काही क्षणातच चक्रव्यूहाच्यामध्ये सापडलेल्या अभिमन्यूच्या रथाला चारही बाजूने द्रोण, कृप, कर्ण व दुर्योधन या कौरवसेनेतील सर्वश्रेष्ठ वीरांनी घेरून टाकले.

इकडे अभिमन्यूचा पाठ-पुरावा करीत येणाऱ्या युधिष्ठिर, भीम व अन्य वीरांना जयद्रथाने रोखून

धरले. जयद्रथाने यापूर्वी एकदा पांडवांकडून पराभूत झाल्यावर पांडवांना हरविता यावे यासाठी तपश्चर्या केली होती. भगवान शंकराकडून त्याला वर हवा होता. अर्जुन अजेय होता. त्याला तसा वर पूर्वीच मिळाला होता. तेव्हा अर्जुन नसताना इतर पांडवांना तू पराभूत करू शकशील, असा शंकराने त्याला वर दिला. शंकराच्या वराने उन्मत्त झालेल्या जयद्रथाने नेमकी यावेळी संधी साधून पांडववीरांना अडवून धरले.

आणि तिकडे अभिमन्यू शत्रूपक्षाकडील सर्वश्रेष्ठ महारथींना एकटाच तोंड देत होता. दुर्योधन, द्रोण, कृप, कर्ण व अश्वत्थामा या पाच योद्धांना अभिमन्यूने एकाच वेळी रोखून धरले. क्षणाचाही विलंब न लागता त्याच्या भात्यातून बाण निघत होते व शत्रुपक्षाचे वीर जमिनीवर कोसळत होते. त्याच्या बाणाने कर्णाच्या ढालीच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. सुषेण, दीर्घलोचन व शल्य यांच्यासारख्यांची पाचावर धारण बसली. तळपत्या सूर्याच्या या अभूतपूर्व तेजाने दिपून

कौरवसेना माघार घेऊ लागली. गुरू द्रोणाचार्य स्वत: हे शौर्य अनुभवीत होते. कौतुकाने त्यांच्या तोंडून अभिमन्यूची प्रशंसा बाहेर पडली.

त्यावर दुर्योधनाचा क्रोधाग्नी भडकला. दु:शासनाला तो म्हणाला, द्रोणाचार्यांना अर्जुना-बद्दल अतीव प्रेम आहे. त्यामुळे ते या अर्जुन-पुत्राचा कधीही वध करणार नाहीत. त्याचा वध करायची जबाबदारी आता आपणच उचलायला हवी."

दु:शासन त्वेषाने म्हणाला, "अभिमन्यूला मी ठार मारतो. अभिमन्यू मरताच दु:ख शोकामुळे अर्जुनही जिवंत राहणार नाही."

द्यूतक्रीडेत पांडव हरले तेव्हा याच दु:शासनाने भरसभेत द्रौपदीचा अपमान केला होता. या दु:शा-सनाचा पांडवांना सूड घ्यायचाच होता.

पण दु:शासनही योद्धा होता. तो समोर दिसताच अभिमन्यूचा राग उफाळून आला. तो

म्हणाला, " शेवटी तू समोर आलास. तुझ्या पापाचे व क्रूरतेचे फळ तुला मिळायलाच हवे. आणि ते फळ मी तुला या येथेच भोगायला लावणार आहे. या युद्धभूमीवरून जीव वाचवून तू पळाला नाहीस तर आता जगातली कोणतीही शक्ती तुला वाचवू शकणार नाही."

—आणि अभिमन्यूने प्रत्यंचा ओढली. निघालेला तीर सरळ दु:शासनाच्या छातीत घुसला नि रक्ताची चिरकांडी उडाली. दु:शासन मूर्छित होऊन पडला. त्याच्या सारथ्याने रणांगणावरून पळ काढला.

दु:शासनाची ही गत पाहून महारथी कर्ण समोर आला. कर्ण परशुरामाचा शिष्य होता. याच परशुरामाने एकवीस वेळा क्षत्रियांचा नायनाट केला होता. कर्णाने अभिमन्यूवर शंभर बाण सोडले. पण अभिमन्यूने ते लीलया परतवले. एवढेच नव्हे तर त्याने कर्णाच्या रथाची ध्वजा तोडली. अभिमन्यूच्या अचूक शरवर्षावाने कर्णाच्या

रथाचे घोडे उधळले आणि माघारी फिरले. कर्णाची दुर्दशा पाहून कौरवसेनेच्या तोंडचे पाणी पळाले.

पलिकडे युधिष्ठिर, भीम, व सात्यकी अभिमन्यूपर्यंत पोहोचण्याचे सारखे प्रयत्न करीत होते. पण व्यूहरचनेमुळे त्यांना वेगाने पुढे सरकणे शक्य होत नव्हते.

दुर्योधनाने कौरवसेनेला धीर दिला. परिस्थिती अजून आटोक्याबाहेर गेली नव्हती. काही पांडववीर अभिमन्यूपासून दूर होते तर अर्जुन लढत-लढत युद्धभूमीच्या वराच बाजूला गेलेला होता. एकटच्या अभिमन्यूला अडचणीत आणून आपण परिस्थितीवर मात करू शकू असे दुर्योधनाला वाटले. कर्ण, द्रोण व अश्वत्थामा यांच्यासह दुर्योधन पुन्हा अभिमन्यूवर चालून गेला. दुर्योधनपुत्र लक्ष्मणाचा रथही त्यांना येऊन मिळाला होता. काही वेळ युद्धाची धुमश्चक्री उडाली. या कौरववीरांचे आक्रमण निष्प्रभ ठरले आणि क्षणार्धात अभिमन्यूच्या धनुष्यातून सूं सूं करीत

निघालेल्या बाणाने दुर्योधनपुत्राचा वेध घेतला. लक्ष्मणाचे शिर उडून धुळीत कोसळले. सर्वत्र हाहाकार माजला.

कौरवसेनानी हताश झाले. कर्ण गुरू द्रोणांजवळ गेला व त्यांना म्हणाला, "गुरुवर्य, अभिमन्यूला कसे पराभूत करावे ?"

द्रोण उद्‌गारले, "कर्णा, अभिमन्यूचा पराभव करणे अशक्य आहे. तो पुरुषसिंह आहे. त्याचे हात व बोटे पाहा. विजेच्या गतीने तो शरसंधान करतोय. त्याचा तीर भात्यातून केव्हा निघतो व धनुष्यावर केव्हा चढतो ते समजतही नाही. त्याच्या शरवर्षावाने माझ्याच शरीराची चाळणी झाली आहे. त्याच्या शौर्यापुढे मी हात टेकले आहेत."

कर्ण उत्तरला, "युद्धातून पळणे भ्याडपणाचे लक्षण आहे. म्हणूनच मी येथे आहे. अन्यथा त्याच्या अचूक शरवर्षावाला तोंड देणे मला कठीण झाले आहे. त्याला पराभूत करायचा मार्ग तुम्ही आमचे सेनानी म्हणून सांगायलाच हवा."

द्रोण म्हणाले, "अभिमन्यू बालक असला तरी महान वीर आहे. समोरासमोर त्याचा पराभव करणे कठीणच नव्हे, तर असंभव आहे. त्याचे धनुष्य कोणी तोडू शकला तर अभिमन्यू पराभूत होऊ शकेल. तुझी इच्छा असेल तर तो शरवर्षाव करताना दुसऱ्या बाजूला वळेल तेव्हा त्याच्या धनुष्यावर आघात कर. त्याचे धनुष्य तुटले तर तुम्ही जिंकू शकाल. अन्यथा हाती धनुष्य असताना त्याचा पराभव करणे कठिण आहे."

कर्णाने मनोमनी काही निर्णय घेतला. अभिमन्यूच्या रथाच्या मागच्या भागाला त्याने आपला रथ वळविला आणि युद्धात मग्न असलेल्या अभिमन्यूच्या धनुष्याचा, त्याचे लक्ष नसताना वेध घेतला. मागून आलेल्या त्या अनपेक्षित वेगवान बाणाने आपले काम केले. अभिमन्यूचे धनुष्य मोडले. त्याचवेळी भोजाने अभिमन्यूच्या रथाच्या घोड्यावर वार केले. घोडे खाली कोसळले. आता अभिमन्यूचा रथ पुढे जाऊ शकत नव्हता. कृपाचार्याने अभिमन्यूच्या रक्षकांवर हल्ला करून त्यांना ठार मारले.

द्रोण, कृप, कर्ण, अश्वत्थामा, बृहद्‌बल व कृतवर्मा या सहा महारथींनी आता या सोळा वर्षीय नि:शस्त्र बालकाला घेरले होते आणि त्याच्या साह्यार्थ एकही पांडववीर तेथे नव्हता,

पण त्या क्षणीही अभिमन्यू डगमगला नाही. खड्‌ग घेऊन तो रथातून खाली उतरला. तो खाली उतरताच द्रोण व कर्ण यांनी एकाच वेळी वार करून त्याची ढाल तोडली, तेव्हा त्या शूर बालकाने आपल्या रथाचे चाक उपटून हाती घेतले व तो शत्रूंवर तुटून पडला. चारही बाजूंनी कौरवसेनेचे महारथी अविरत शरवर्षाव करीत असतानाही हा चक्रधर पुढे पुढे सरकतच होता. सारे महारथी रथावर आरूढ होते तर अभिमन्यू-जमिनीवर ! अशा स्थितीतही त्याने दु:शासन-पुत्राचा रथ तोडला, घोडे मारले. दु:शासनपुत्र गदा घेऊन खाली उतरला भीषण गदायुद्ध झाले. सकाळपासून चक्रव्यूह भेदून लढणारा अभिमन्यू आता थकून गेला होता, एवढ्या वीरांना तोंड देणाऱ्या या शूर बालकाचे त्राण आतां संपत आले होते. तरीही त्याने गदेचा प्रहार करून

दुःशासनपुत्राला जखमी केले. त्याच्या वाराने अभिमन्यूही बेशुद्ध झाला आणि तो बेशुद्धावस्थेत असतांनाच दुःशासनपुत्राने उठून त्याच्यावर पुन्हा गदेचा प्रहार केला. एक तेजस्वी तारा निखळून खाली पडला. देवादिकांचे डोळे पाणावले. एका वीर बालकाने शत्रूशी लढत घेत वीरमरण पत्करले. अभिमन्यू अमर झाला !

□ □

शाखा.
क्र. 9393 दि. ७/१/८२

॥ श्री ॥

# भारत - भारती

## बाल-पुस्तकमाला

( मराठी )

१. स्वामी विवेकानंद
२. स्वातंत्र्यवीर सावरकर
३. पं. दीनदयाल उपाध्याय
४. नचिकेता
५. भगिनी निवेदिता
६. वीर अभिमन्यू
७. विश्वामित्र
८. लाला लजपतराय
९. महासती द्रौपदी
१०. संत गुलाबराव महाराज
११. गुरुपुत्र फतेहसिंह, जोरावरसिंह
१२. छत्रपती शिवाजी

□

किंमत प्रत्येकी रुपये २-००

विविधतेत एकतेचे दर्शन
भाषिक एकात्मतेचा अनुभव

# "गीत - भारती"

आपल्या देशातील १४ भाषांमधील ६६ राष्ट्रीय गीते
देवनागरी लिपीत
सोबत त्यांचा हिन्दी भावार्थ

आकार १ / ८ क्राऊन : पृष्ठ-संख्या १५०

BVBK-0401313

प्राप्ति-स्थान

**भारत-भारती**

बाल-पुस्तकमाला

रुईकर पथ, नागपूर-४४० ००२